# बृहन्मुंबई महानगरपालिका सुरक्षा दल

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध विभागांमध्ये 'कोविड-19' या रोगाचा प्रादुर्भाव वाढत असल्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध रुग्णालयांत 'कोविड-19' बाधित रुग्णांकरिता उपचार सुरू असलेल्या रुग्णालयांमध्ये सुरक्षाविषयक सेवा देण्याकरिता **'कंत्राटी सुरक्षा रक्षक'** ही पदे माजी सेवानिवृत्त सैनिकांमधून फक्त सहा महिन्यांकरिता कंत्राटी पद्धतीने नेमणूक करण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. इच्छुक उमेदवारांनी शैक्षणिक अर्हतेच्या साक्षांकित छायांकित प्रती व अलीकडेच काढलेले पासपोर्ट आकाराचे स्वतःचे छायाचित्र अर्जावर चिकटवून विहित नमुन्यातील अर्ज दिनांक 25/04/2020 ते दिनांक 28/04/2020 पर्यंत कार्यालयीन वेळेत सकाळी 10.00 ते सायं. 6.00 पर्यंत **बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय, गेट क्रमांक - 7, फोर्ट, मुंबई- 400 001 किंवा cso.security@mcgm.gov.in या ई-मेलवर सादर करावेत.**

दिनांक 28/04/2020 रोजी सायं. 6.00 या वेळेनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही अथवा त्याबाबतचा कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार स्वीकारला जाणार नाही.

**संपर्कासाठी दूरध्वनी क्रमांक : 022-2492 2772**

**कंत्राटी पद्धतीने सहा महिन्यांकरिता भरावयाची पदे.**

| अ.क्र. | संवर्ग | एकूण पदे | निश्चित ठोक प्रतिमाह वेतन |
|---|---|---|---|
| 1 | सुरक्षा रक्षक | 320 | रुपये 25,000/- |

**शैक्षणिक अर्हता :**

1) **दहावी पास (100 गुणांच्या मराठी विषयांसहीत)**

**वयोमर्यादा :**

उमेदवाराचे वय दिनांक 25/04/2020 रोजी किमान 20 वर्षे असावे व कमाल 38 वर्षांपेक्षा जास्त नसावे. (मागासवर्गीय उमेदवाराकरिता वय 43 वर्षे.)

माजी सेवानिवृत्त सैनिकांसाठी सशस्त्र दलात किमान सहा महिने सेवा केलेल्या माजी सेवानिवृत्त सैनिकांनी सशस्त्र दलात केलेल्या अखंड सेवेइतका कालावधी अधिक तीन वर्षे एवढा कालावधी त्यांच्या विहित दिनांकातून वगळून त्या दिनांकास येणारे त्यांचे वय विचारात घेतले जाईल.

**सर्वसाधारण अटी :**

1) उमेदवाराला कोणत्याही न्यायालयाने नैतिक अधःपतन किंवा फौजदारी स्वरूपाच्या खटल्यात शिक्षा दिली असल्यास/ शिक्षा झालेली असल्यास उमेदवाराने त्याबाबत माहिती देणे आवश्यक आहे.
2) निवड झालेल्या उमेदवाराविरुद्ध कोणताही गुन्हा नोंदविलेला नाही अथवा सिद्ध झालेला नाही, असे चारित्र्य प्रमाणपत्र संबंधित पोलिस ठाण्यामधून नेमणुकीनंतर एक महिन्याच्या आत सादर करणे आवश्यक आहे.
3) उमेदवार नोकरी करीत असल्यास पूर्वीच्या संस्था मालकाचे ना हरकत प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.
4) माजी सेवानिवृत्त सैनिकांनी अर्जासोबत माजी सेवानिवृत्त सैनिक असल्याबाबतची कागदपत्रे जोडावीत. तसेच मुलाखतीसाठी येताना सदर कागदपत्रांच्या मूळ/ साक्षांकित छायांकित प्रतींसह उपस्थित राहावे.
5) निवड प्रक्रिया सुरू झाल्यानंतर किंवा करारानंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती/ प्रमाणपत्रे/ कागदपत्रे सादर केल्यास किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल. तसेच करार झालेला असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्यांचा करार समाप्त

करण्यात येईल.

6) प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव निवड प्रक्रिया कोणत्याही वेळेस/ कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार म. न. पा. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना राहतील.
7) उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.
8) सदर कंत्राटी तत्त्वावरील करार कोणत्याही वेळी पूर्वसूचना न देता रद्द करण्याचे अधिकार म. न. पा. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना राहतील.
9) सदर कंत्राटी तत्त्वावरील करार कालावधीमध्ये उमेदवाराने शिस्तभंग केल्याचे निदर्शनास आल्यास त्यांचा करार तत्काळ रद्द करण्यात येईल.
10) निवड झालेल्या उमेदवारास रुपये 100/- किंवा विधी आकाराप्रमाणे (वेतन मिळकतीनुसार) करारनामा (बॉण्ड) पेपरवर विहित नमुन्यातील कंत्राट करार करणे आवश्यक असून सदरहू खर्च संबंधित उमेदवारांस करावा लागेल.
11) कुठल्याही कारणास्तव कंत्राटी पद्धतीत निवड झालेल्या उमेदवारास पदाचा राजीनामा द्यावयाचा असल्यास त्याने 30 दिवसांची पूर्वसूचना देणे बंधनकारक आहे.

**विशेष सूचना :**

1) यापूर्वी संबंधित कार्यालयात किंवा अन्य ठिकाणी सादर केलेले/ प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत; तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला किंवा इतर दुसऱ्या संस्थेला अर्ज विकणे/ स्वीकारणे इत्यादींचा अधिकार देलेला नाही.
2) टपालाने आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.
3) मुलाखतीच्या वेळी आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या मूळ प्रती/ साक्षांकित छायांकित प्रतींसह उपस्थित राहणे अनिवार्य आहे.
4) उमेदवारास पूर्वानुभव असल्यास त्याच्या प्रमाणपत्राच्या मूळ प्रतींसह/ साक्षांकित छायांकित प्रतींसह मुलाखतीस उपस्थित राहावे.
5) मुलाखतीचे स्थळ : भांडुप संकुल, भरती व प्रशिक्षण केंद्र, दर्गा रोड, खिंडीपाडा, मुलुंड (पश्चिम), मुंबई- 400 082.
6) मुलाखती दिनांक 30/04/2020 रोजी सकाळी 9.00 ते सायं. 4.00 वाजेपर्यंत घेतल्या जातील.
7) निवडीचे निकष हे उमेदवाराची दहावीची एकूण टक्केवारी व मुलाखतीवर आधारित असतील; तसेच कमी वयाच्या उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल.

---

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## <u>अर्जाचा नमुना</u>

## पदाचे नाव : कंत्राटी सुरक्षा रक्षक

| फोटो आकार 2.5 सें.मी. X 3.00 सें.मी. |
|---|

**प्रति,**

**मा. प्रमुख सुरक्षा अधिकारी,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका सुरक्षा दल,**
**वरळी.**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सुरक्षा खात्यातील **'कंत्राटी सुरक्षा रक्षक'** या पदाकरिता मी खाली सही करणारा विनंती अर्ज करीत आहे.

1) संपूर्ण नाव (आडनाव प्रथम) मराठीत :

आडनाव ------------------------------

नाव ------------------------------

वडिलांचे नाव ------------------------------

2) पत्ता (पत्रव्यवहाराचा पत्ता) ------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

3) शैक्षणिक अर्हता :

| परीक्षेचे नाव | प्राप्त झालेले गुण | | | मंडळ/ विद्यापीठाचे नाव |
|---|---|---|---|---|
| | एकूण गुण | मिळालेले गुण | टक्केवारी | |
| एस. एस. सी. | | | | |

4) भारतीय सैन्य दलातील नियुक्ती दिनांक ----------------------------------------

भारतीय सैन्य दलातील धारण केलेले पद ----------------------------------------

भारतीय सैन्य दलातून निवृत्त दिनांक ----------------------------------------

भारतीय सैन्य दलातून निवृत्तीचे कारण ----------------------------------------

## - प्रतिज्ञापत्र -

मी यान्वये प्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करतो की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून ती खरी आहे. भरती परिपत्रकामध्ये दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. त्यापैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास; तसेच उपरोक्त दिलेल्या माहितीच्या आधारे करार झालेला असताना सेवेतून कमी केल्यास त्याबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही. अर्जाद्वारे दिलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यास बृहन्मुंबई महानगरपालिका माझ्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करू शकते, याची मला जाणीव आहे.

**दिनांक :** ........../........../......................

**आपला विश्वासू,**

**सोबत :**

..........................................................

**(अर्जदाराची सही व नाव)**

1)

2)

3)